महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई

दुरध्वनी: संकेतस्थळ: http://www.med-edu.in & http://www.dmer.org

जा.क्र.संवैशिवसं/गट-क तांत्रिक/तात्पुरती ज्येष्ठता सूची/फ2/५४६५ /2020, दिनांक:-२५ /09/2020

प्रति,

सर्व अधिष्ठाता/अधिक्षक/अधिक्षिका/प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राचार्य,

..........................................................................................

विषय:- संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थांमधील गट-क (तांत्रिक) संवर्गातील पदांवर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नत्या प्रदान करण्याकरीता दिनांक 01.01.2020 रोजीची सहाय्यक दंत तंत्रज्ञ या पदाची राज्यनिहाय तात्पुरती सेवा ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याबाबत........

सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अधिनस्त असलेली शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये, आरोग्य पथकांच्या आस्थापनेवरील गट क (तांत्रिक) संवर्गातील सहाय्यक दंत तंत्रज्ञ या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती प्रदान करण्याकरीता दिनांक 01.01.2020 रोजीची राज्यनिहाय तात्पुरती सेवा ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर ज्येष्ठता सूची प्रसिध्द झाल्याची बाब तात्काळ आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी व सदरील सेवा ज्येष्ठता सूचीत काही दोष/चुका/त्रुटी असल्यास त्यांची अभिवेदने मागवून सेवा ज्येष्ठता सूची प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून 7 दिवसांचे आत संबंधित आस्थापना अधिकारी/कर्मचारी यांनी संचालनालयाच्या फ कार्यासनास हस्तपोच सादर करावीत. तदनंतर प्राप्त झालेल्या अभिवेदनांचा विचार केला जाणार नाही, ही बाब संबंधित कर्मचाऱ्यांना अवगत करुन द्यावी. कर्मचाऱ्यांनी सेवा ज्येष्ठता सूचीबाबत काही आक्षेप असल्यास योग्य त्या सहपत्रांसह संस्थाप्रमुखांमार्फतच आक्षेप नोंदवावेत. कर्मचाऱ्यांनी संचालनालयास थेट अर्ज न सादर करण्याबाबत कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात, कर्मचाऱ्यांनी थेट संचालनालयास अभिवेदन सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

तात्पुरत्या सेवा जेष्ठता सूचीस अंतिम स्वरुप देत असतांना पुढील बाबींची दक्षता बाळगावी. कर्मचारी ज्या पदावर कार्यरत आहे त्याच पदाची माहिती सेवा ज्येष्ठता सूचीत नमूद केली आहे किंवा नाही हे पहावे. उदा.सहाय्यक दंत तंत्रज्ञ या पदावर कार्यरत असतांना दंत तंत्रज्ञ या पदावर तदर्थ पदोन्नती दिलेली असल्यास सदर कर्मचाऱ्याचे नाव सहाय्यक दंत तंत्रज्ञ पदाच्या सेवा ज्येष्ठता सूचीत आहे याची खातरजमा करावी. काही संस्थांकडून प्राप्त माहितीमध्ये कर्मचाऱ्यांच्या केवळ जातीचे नाव नमूद करण्यात आलेले आहे त्याऐवजी जातीचा संवर्ग नमूद करावा तसेच त्या कर्मचाऱ्यांची जात वैधता पडताळणी झालेली आहे किंवा नाही याबाबत शेरा या रकान्यात स्पष्ट नमूद करावे. सेवा जेष्ठता सूचीतील जे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असतील त्यांच्या नावासमोर त्याचा स्पष्ट उल्लेख करुन यादी सादर करावी. तसेच ज्या कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे अथवा प्रस्तावित केलेली आहे अशा कर्मचाऱ्यांच्या नावासमोर तसा उल्लेख करावा.

उपरोक्त तात्पुरत्या स्वरुपातील सेवा ज्येष्ठता सूचीस अंतिम स्वरुप देत असतांना संस्थांकडून अचूक माहिती प्राप्त होणे अपेक्षित आहे. चुकीची / अपुरी माहिती सादर केल्यामुळे तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपली राहिल याची कृपया नोंद घ्यावी. सेवा ज्येष्ठता सूचीबाबत काही शंका असल्यास संचालनालयाच्या फ कार्यासनातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा तसेच सदर यादी प्रसिध्द करीत असतांना कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्यास होणार नाही यादी दक्षता घ्यावी.

सह संचालक (दंत)

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

Scanned with CamScanner

# गट-क (तांत्रिक) संवर्गाची दिनांक 01/01/2020 रोजीची अंतिम जेष्ठता सूची

## सहाय्यक दंत तंत्रज्ञ

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | कार्यरत संस्था | जातीचा प्रवर्ग | नियुक्ती दिनांक | जन्म दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | नियुक्तीचे माध्यम | जात प्रमाणपत्र | शैक्षणिक अर्हता | सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री कमलेश भ.जोशी | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई | खुला | 21/09/1983 | 29/10/1961 | 31/10/2019 | सरळसेवा | -- | एसएससी दंततंत्रज्ञ कोर्स | 5200-20200 ग्रेड पे 2400 | (एस-8) 25500-81100 | सेवानिवृत्त |
| 2 | श्रीमती हेमांगी रविंद्र मिरलेखकर | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | खुला | 01/07/1987 | 14/03/1966 | 21/03/2024 | सरळसेवा | -- | एसएससी, डीएमसी | 5200-20200 ग्रेड पे 2400 | (एस-8) 25500-81100 | |
| 3 | श्री माधव गोविंद परोडवाड | डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड | अ.ज. | 18/05/2001 | 20/04/1980 | 30/04/2038 | सरळसेवा धरणग्रस्त | | एसएससी डीएमएलटी | | | |
| 4 | श्रीमती रेखा बाळकृष्ण कदम | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई | अ.जा. | 18/07/2003 | 12/03/1975 | 31/03/2033 | सरळसेवा | | एसएससी दंततंत्रज्ञ कोर्स | | | दंततंत्रज्ञ पदावर पदोन्नती |
| 5 | श्री संजय बापूराव फेदुजवार | श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ | इमाव | 28/06/2006 | 30/12/1968 | 31/12/2026 | सरळसेवा | | एचएससी, डीएमसी, डीएचसी | 5200-20200 ग्रेड पे 2400 | (एस-9) 29200-92300 | |
| 6 | श्री महेन्द्र पुरुषोत्तम अमृतकर | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | खुला | 14/01/2009 | 19/02/1986 | 29/02/2044 | सरळसेवा | -- | एचएससी, डीएमसी | 5200-20200 ग्रेड पे 2400 | (एस-8) 25500-81100 | |
| 7 | श्रीमती कांचन युवराज खाडे | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज | अ.ज. | 14/05/2013 | 23/10/1991 | 31/10/2049 | सरळसेवा | | एसएससी दंततंत्रज्ञ कोर्स | | | |
| 8 | श्रीमत दर्शना शंतनु राऊत (बोंद्रे) | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज | अ.जा. | 04/06/2013 | 12/10/1984 | 31/10/2042 | सरळसेवा | | एसएससी दंततंत्रज्ञ कोर्स | | | |
| 9 | श्री संदिप प्रभाकर आढाव | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज | खुला | 13/11/2013 | 30/10/1987 | 31/10/2045 | सरळसेवा | | एसएससी दंततंत्रज्ञ कोर्स | | | |
| 10 | श्री प्रसाद वाघ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर | खुला | 26/11/2013 | 04/08/1990 | 31/08/2048 | सरळसेवा | | एसएससी दंततंत्रज्ञ कोर्स | | | |

सहसंचालक (दंत)

Scanned with CamScanner